## ENVIRONMENT AND CLIMATE CHANGE DEPARTMENT

15th Floor, New Administrative Building, Madam Cama Road,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 28th March 2022.

*NOTIFICATION*

No. Plastic-2021/C.R. 25/T.C.-1.—Whereas, under the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Act, 2006, for regulating Manufacture, Usage, Sale, Storage, Transport of the products made from plastic and thermocol etc., the Government of Maharashtra published the Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage) Notification, 2018 on 23rd March 2018, which was amended as per Notification dated the 11th April 2018, 30th June 2018 and 14th June 2019;

And whereas, as per the para 8 of the said notification, for implementation of these regulations and help in resolving any difficulty faced by implementing authorities during implementation and if required also carry out any amendment in these regulations, the Government *vide* Government Resolution dated 22nd March 2018 constituted the Empowered Committee;

And whereas, the Empowered Committee resolved to make amendments in the Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage) Notification, 2018.

Now, therefore, in exercise of the powers conferred by Clause (*1*) and (*2*) of section 4 of the Maharashtra Non-Biodegradable Garbage (Control) Act, 2006, the Governbment of Maharashtra hereby makes following amendments in Maharashtra Plastic and Thermocol Products (Manufacture, Usage, Sale, Transport, Handling and Storage) Notifiation, 2018.

**1.** In the notification dated 14th June 2019, the Para. 1 is substituted as follows :—

" In the Notification dated 30th June 2018 in Clause 4 of Para. 4 is deleted and the following items are inserted :—

(1) Serial No. (1) shall be read as it is.

(2) Serial No. (2) shall be read as it is.

(3) Serial No. (3) shall be read as it is.

(4) Serial No. (4) is substituted as follows :—

Plastic material/thermocol packaging used for wrapping the material at the manufacturing stage or is an integral part of manufacturing shall comply the following conditions :—

(*a*) The packaging material shall be more than 50-micron thickness.

(*b*) The packaging material shall be made up of minimum 20 per cent recyclable material (except for food packaging).

(*c*) The packaging material (except for export purpose) shall be printed with manufacturer's details, type of plastic with code number and buyback price.

(*d*) The manufactures/manufacturer's association using plastic material/thermocol for packaging, shall work together and create a buy-back mechanism and diligently implement their Extended Producer's Responsibility (EPR) Plan which includes co-ordination/collaboration with existing Rag Pickers/Scrap Traders, retailers for collection of plastic/thermocol waste and its subsequent recycling and final disposal through their own established recycling plant or registered recyclers by establishing Producer's Responsible Organizations, which shall be responsible for 100 per cent. integral plastic/thermocol waste management from collection to final disposal.

(5) Serial No. (5) shall be read as it is.

(6) Serial No. (6) shall be read as it is.

(7) Serial No. (7) shall be read as it is".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY B. SANDANSHIV,
Under Secretary to Government.

RNI No. MAHBIL/2009/31743

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार–ब

वर्ष ८, अंक ७] गुरुवार ते बुधवार, मार्च ३१-एप्रिल ६, २०२२/चैत्र १०-१६, शके १९४४ [पृष्ठे ८, किंमत : रुपये २०.००

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

१५वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ मार्च २०२२.

### अधिसूचना

क्रमांक प्लास्टिक-२०२१/प्र.क्र. २५/तांक-१.— ज्याअर्थी, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत महाराष्ट्र शासनाद्वारे प्लास्टिक व थर्माकॉल इत्यांदीपासून बनविलेल्या अविघटनशील वस्तुंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक यांचे नियमन करण्याकरिता, दिनांक २३ मार्च २०१८ रोजी प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशील वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच दिनांक ११ एप्रिल २०१८, दिनांक ३० जून २०१८ व १४ जून २०१९ च्या अधिसूचनेन्वये सुधारणा प्रसिद्ध करण्यात आली होती;

आणि ज्याअर्थी, सदर अधिसूचनेच्या परिच्छेद ८ नुसार भविष्यात या नियमनामध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे वा अंमलबजावणीबाबत आढावा घेऊन अंमलबजावणीमध्ये येणारे अडथळे वा त्रुटी यावर वेळोवेळी निर्णय घेणे इत्यादींसाठी व इतर अविघटनशील कचऱ्यावर नियमनाबाबत निर्णय घेण्यासाठी दिनांक २२ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये शक्तीप्रदत्त समिती गठीत करण्यात आली होती;

आणि ज्याअर्थी, शक्तीप्रदत्त समितीने महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशील वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ या अधिसूचनेमध्ये काही सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ च्या कलम ४ ची पोट-कलमे (१) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशील वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :–

२. दिनांक १४ जून २०१९ च्या अधिसूचनेमध्ये परिच्छेद १ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :–

“ दिनांक ३० जून २०१८ च्या परिच्छेद ४ चा अनुक्रमांक ४ वगळण्यात येत असून त्यात खालील बाबी अंतर्भूत करण्यात येत आहेत :–

(५) अनुक्रमांक १ मध्ये बदल नाही.

(६) अनुक्रमांक २ मध्ये बदल नाही.

(७) अनुक्रमांक ३ मध्ये बदल नाही.

(८) अनुक्रमांक ४ मध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे,–

उत्पादनाच्या ठिकाणी, उत्पादनाच्या प्रक्रियेदरम्यान अनिवार्य वेष्टनासाठी वापरण्यात येणारे प्लास्टिक आवरण/थर्माकॉलचा वापर करण्यास पुढील अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील :–

(अ) पॅकेजिंगसाठी वापरण्यात येणारे प्लास्टिक ५० मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीचे असणे बंधनकारक राहील.

(ब) पॅकेजिंगकरिता (अन्न पदार्थ पॅकींग व्यतिरिक्त) वापरण्यात येणारे प्लास्टिक हे कमीतकमी २० टक्के पुनर्चक्रीकरण असलेल्या प्लास्टिकपासून बनविणे बंधनकारक राहील.

(क) पॅकेजिंगकरिता (निर्यातीसाठी व्यतिरिक्त) वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिकवर उत्पादकाचा तपशील, प्लास्टिकचा प्रकार (कोड क्रमांकासह), पुनर्खरेदी किंमत, मुद्रीत करणे बंधनकारक राहील.

(ड) पॅकेजिंगकरिता लागणारे प्लास्टिकचे उत्पादन करणारे उत्पादक / उत्पादक संघटनेचे उत्पादक दायित्व योजनेअंतर्गत, कचरा वेचक/भंगारवाले, किरकोळ विक्रेता यांच्या सहभागाने, प्लास्टिक कचऱ्याच्या पुनर्प्रक्रियेची केंद्रे उत्पादक जबाबदारी संस्थेच्या (Producers Responsibility Organization) माध्यामातून उभारावी किंवा संकलित केलेल्या प्लास्टिकची अधिकृत पुनर्चक्रीकरण केंद्राद्वारे १०० टक्के विल्हेवाट लावणे बंधनकारक राहील.

(५) अनुक्रमांक ५ मध्ये बदल नाही.

(६) अनुक्रमांक ६ मध्ये बदल नाही.

(७) अनुक्रमांक ७ मध्ये बदल नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय ब. संदानशिव,**
शासनाचे अवर सचिव.